0 8 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरचा पंचखंडात्मक भौगोलिक, इतिहास येणार प्रकाशात!

## शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्राचा नाविण्यपूर्ण प्रकल्प

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

दहा वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर शिवाजी विद्यापीठ शाहू संशोधन केंद्रातर्फे 'कोल्हापूरचा पंचखंडात्मक इतिहास' हा पाच खंडात ग्रंथ साकारला जात आहे. ग्रंथातून कोल्हापूरचा इत्यंभूत भौगलिक व ऐतिहासिक अनमोल ठेवा जगासमोर येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी १९७० रोजी शाहू संशोधन केंद्राची स्थापना केली. केंद्रामध्ये कोल्हापूरचे राजघराणे व मराठा समाजातील कुटुंबाची एक हजारांहून अधिक दुर्मीळ छायाचित्रे उपलब्ध आहेत. डॉ. आप्पासाहेब पवार (१५३६), भाई माधवराव बागल (६३८), पी. बी. साळुंखे (८०), डी. डी. किणीकर, (२६०), डॉ. जयसिंगराव पवार (२८५) ग्रंथ, पुस्तके आणि विजयी मराठा, राष्ट्रवीर, हंटर, विद्याविलास, ब्राह्मणेतरचे अंक आहेत.

इतिहास विषयाचे प्राध्यापक व गाढे अभ्यासक डॉ. आप्पासाहेब पवार यांनी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील ऐतिहासिक कुटुंबांची माहिती संकलित करून मूळ ऐतिहासिक दस्ताऐवज शोधून काढले. ताराराणीकालीन कागदपत्रे भाग-१, २ व ३, याचबरोबर जिजाबाईकालीन कागदपत्रांचे खंड प्रकाशित केले. पुरातत्त्व विभाग आणि इंडिया ऑफिस लायब्ररी, लंडन येथून त्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्यासंदर्भातील हजारो कागदपत्रे संकलित करून त्याचे संपादन केले. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स (१८८४ ते १८९४) असा खंड प्रकाशित केला. त्यानंतर १९८३ ते २००६ या काळात समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. विलास संगवे यांनी संचालकपदाची धुरा हाती घेतली. त्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्यावरील ८ खंड प्रकाशित केले.

२००७ पासून ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार हे शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक आहेत. त्यांनी राजर्षी शाहू साहित्यमाला अंतर्गत श्रीमच्छत्रपती शाहू यांचे चरित्र : प्रो. आण्णासाहेब लठ्ठे, श्री शाहूंचे चरित्र : संस्कृत : वासुदेव लाटकरशास्त्री, महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी, श्रीमंत क्षात्रजगद्गुरू : विचारदर्शन- भाग १, मेजर ग्रॅहमज स्टॅश्टॅटिकल रिपोर्ट, डॉ. बालकृष्णाज शिवाजी द ग्रेट- खंड १ ते ४, राजर्षी शाहू महाराज आणि कोल्हापूर चळवळ, शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतिकारक, महान शिवाजी खंड- १ व ४ असे ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

शाहू संशोधन केंद्रातर्फे डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'कोल्हापूरचा पंचखंडात्मक इतिहास : कोल्हापूर ऐतिहासिक व भौगोलिक- खंड पहिला' प्रकाशनाच्या मार्गावर आहे. यामध्ये कोल्हापूरचा प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक काळापर्यंत ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, शेती, औद्योगिक असे पाच खंड येत्या तीन वर्षांत प्रकाशित केले जाणार आहेत. त्या-त्या विषयांतील तज्ज्ञांचे यात लेख असतील. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महाराणी ताराराणीपासून ते कोल्हापूरची कला, साहित्य, संस्कृती, संगीत, कुस्ती परंपरा यासह पर्यावरण, जंगले, पक्षी, प्राणी यांची माहिती या खंडांमध्ये असणार आहे.

> शाहू संशोधन केंद्राकडून अथक प्रयत्न व अडचणींवर मात करत छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून ते इतिहासातील समाजसुधारकांची चरित्र साधने प्रकाशित करून समाजासमोर आणली जात आहेत. कोल्हापूरचा पंचखंडात्मक इतिहास पाच खंडाद्वारे प्रकाशित केला जाणार आहे.
>
> **- डॉ. जयसिंगराव पवार,**
> मानद संचालक, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ

### मोडी भाषेतील दुर्मीळ ग्रंथ लवकरच

शाहू संशोधन केंद्राकडून मराठा इतिहासासंदर्भातील डॉ. आप्पासाहेब पवार यांनी संकलित केलेली १६६४ ते १८५० या काळातील मोडी भाषेतील दुर्मीळ कागदपत्रांचा ग्रंथ लवकरच प्रकाशित केला जाणार आहे. इतिहास संशोधक के. जी. सूर्यवंशी याचा 'मल्लविद्या : पौराणिक ते मध्ययुगीन काळ' या ६०० पानांच्या मराठी ग्रंथाचे काम सुरू आहे. छत्रपती राजाराम महाराज (१९२२ ते १९४०) यांच्यावरील पाच खंडांचा ग्रंथदेखील शाहू संशोधन केंद्राकडून प्रकाशित होणार आहे.



लोकमत

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा २५ पासून

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिलमध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षा २५ मेपासून सुरू होणार आहेत. याबाबतचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाने शनिवारी जाहीर केले. विद्यापीठ परीक्षा विभागाने या परीक्षा जूनमध्ये घेण्याचे जाहीर केले होते. मात्र, विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वर्ष व निकालाच्या अनुषंगाने या परीक्षा अलीकडे घेण्याची मागणी विद्यार्थ्यांमधून होत होती.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने या परीक्षा २५ मेपासून घेण्याचा निर्णय घेतला. बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी भाग-३, बीसीए, बीए बीएड या परीक्षा जुलैपर्यंत चालणार आहेत. पदवी स्तरावरील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे वेळापत्रकही लवकरच जाहीर केले जाणार आहे.